दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ,बाभळगाव द्वारा संचालित

# कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,बाभळगाव

ता.जि.लातूर

**दिनांक : 11.09.2026**

## कार्यक्रमाचे नाव : राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन




**राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्रसंगी सुत्र संचलन करताना डॉ.इंद्रजित शिंदे**




**राज्यशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन प्रसंगी पाहुण्याच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करताना**



राज्यशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रस्तावित करताना डॉ.के.पी.पोले सर




राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे डॉ.नानासाहेब जाधव




**राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्रा.चंद्रकांत मोरे**






**राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन कार्यक्रमाचे आभार मानताना कु.कांबळे कविता**




**राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी**

देशोन्नती

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचालित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी डॉ. नानासाहेब जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. चंद्रकांत गोरे होते. पदवी स्तरावर राज्यशास्त्र विषयाचा अभ्यास हा विद्यार्थ्यांना केवळ राजकीय व्यवस्था व शासनसंस्थांची माहिती देणारा नसून, भारतीय संविधान, लोकशाही व्यवस्था, राज्यसंस्था, राजकीय विचार, सार्वजनिक प्रशासन, नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये, निवडणूक प्रक्रिया आणि समकालीन राजकीय घडामोडी यांचे चिकित्सक आकलन करून देणारा विषय आहे, या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण बौद्धिक विकासासाठी राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

प्रमुख पाहुणे डॉ. नानासाहेब जाधव यांनी मार्गदर्शन करताना राज्यशास्त्र विषयाचा व्यापक आवाका स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान, लोकशाही संस्था आणि देशातील बदलत्या सामाजिक-राजकीय परिस्थितीचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करावा, असे त्यांनी सांगितले.

Latur Edition
Sep 12, 2026 Page No. 2

**बातमी**

दै.एकमत



## कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात अभ्यास मंडळाचे उद्घाटन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमासाठी डॉ. नानासाहेब जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. चंद्रकांत गोरे हे उपस्थित होते. अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमावरील विविध व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रश्नमंजुषा, निबंध व कलागुण स्पर्धा, संविधानविषयक उपक्रम तसेच समकालीन राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर विचारमंथन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. डॉ. नानासाहेब जाधव यांनी समयोचित मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप प्रा. चंद्रकांत गोरे यांनी केला. प्रास्ताविक डॉ. कांतराव पोले यांनी केले.मंचावर अभ्यास मंडळाचे अध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश सुरवसे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र देशमुख यांची उपस्थिती होती. आभार कविता कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकारी गणेश, सय्यद मुस्कान, भारती मिश्रिल, कांबळे यश यांनी परिश्रम घेतले.

**बातमी**